**तात्काळ / कालमर्यादा**

क्र. पोमसं/९(NGO)/९७२७/सन्मानचिन्ह-२०१६/५७५/२०१६, – ९९५ मुंबई, दिनांक २४/११/२०१६

**संदर्भ:-** १. शासन निर्णय, गृह विभाग क्र. पीएमडी/१२९०/२२४४/प्र.क्र.९१/पोल-१, दिनांक २२/०७/१९९२

२. शासन निर्णय, गृह विभाग क्र. पीएमडी/१२०७/प्र.क्र.८७, पोल-१, दिनांक १०/०७/२००७

३. शासन निर्णय क्र. पीएमडी - १२१२ / प्र. क्र. १६६ / पोल - १, दिनांक २९/०४/२०१६

**विषय:- महाराष्ट्रातील पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना सन-२०१६ करिता प्रशंसनीय सेवेबद्दल धातूचे बोधचिन्ह (पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह) व प्रशस्तीपत्र पदान करण्याबाबत...**

*****

## परिपत्रक :-

संदर्भाधीन शासन निर्णयानुसार पोलीस महासंचालक यांना दरवर्षी ५०० पात्र पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना त्यांच्या प्रशंसनीय / गुणवत्तापूर्ण सेवेसाठी महाराष्ट्र दिन १ मे रोजी सन्मानचिन्ह प्रदान करण्यासाठी मंजूरी दिलेली आहे. शासन निर्णयाद्वारे निर्धारीत केलेली पोलीस महासंचालकांची ५०० सन्मानचिन्हे खालील नमूद प्रवर्गातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना प्रदान करण्यात येतील.

| प्रवर्ग क्र. | तपशील |
|---|---|
| १. | १) ज्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना लागोपाठ तीन वेळा राज्य शासनाने शिफारस केल्यानंतरही राष्ट्रपती पोलीस पदक / पोलीस पदक प्रदान करण्यात आलेले नसेल, अशा पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना...<br>२) ज्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र मिळण्यापूर्वी राष्ट्रपती पोलीस पदक / पोलीस पदक मिळेल त्यांना पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात येईल. |
| २. | दरोडेखोर / गुन्हेगारांच्या टोळ्या किंवा अघोर व तंत्रबद्ध गन्हे करणाऱ्या गुन्हेगारांच्या विरुद्ध केलेली कारवाई. |
| ३. | सर्व प्रकारच्या सनसनाटी व कठीण गुन्ह्यांचा यशस्वीपणे शोध लावून तपास करणे. |
| ४. | नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदतकार्य करणे. |
| ५. | जनतेच्या समस्या सोडवून पोलीसांची प्रतिमा उजळ करणे. |
| ६. | राष्ट्रीय स्तरावरील खेळांत प्रावीण्य दाखविणे. |
| ७. | पोलीसांच्या कामात सुधारणा घडविण्याकरिता कार्यवाहीत आणता येतील अशा सूचना करणे. |
| ८. | **१५ वर्षांच्या सेवेचा अभिलेख उत्तम राखल्याबद्दल म्हणजेच -** |

| | |
|---|---|
| | १) कमीत कमी १०० बक्षिसे मिळालेली असावीत.<br>२) मागील १० वर्षांच्या गोपनीय अहवालात / सेवापटात कमीतकमी पाच शेरे अतिउत्कृष्ट / उत्कृष्ट (Outstanding / Very Good) शेरे मिळविलेले असावेत.<br>३) मागील दहा वर्षापैकी एकही शेरा B (ब) नसावा.<br>४) कोणत्याही प्रकारची मोठी शिक्षा नसावी व बेशिस्तीच्या वर्तनाची नोंद नसावी.<br>५) कोणत्याही प्रकारची चौकशी / विभागीय चौकशी / कोर्ट केस प्रलंबित /प्रस्तावित नसावी. |
| ९. | पोलीस मोटार परिवहन विभागातील चालक वर्गाने अपघात न करता २० वर्षाचा अभिलेख उत्तम ठेवल्याबद्दल. |
| १०. | विशेष शाखेत (प्रशिक्षण संस्था धरुन) पाच वर्षे उत्तम कामगिरी केल्याबद्दल. |
| ११. | प्रशंसनीय स्वरुपाचे अन्य दृश्य व अत्युत्तम काम केल्याबद्दल. |

***पोलीस महासंचालकांच्या ५०० सन्मानचिन्हापैकी २० टक्के म्हणजेच १०० सन्मानचिन्हे हे चकमकीमध्ये जखमी झालेल्या, अतिरेक्यांविरुध्द व नक्षलवाद्यांविरुध्द केलेल्या कारवाईमध्ये सामील झालेल्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी राखीव ठेवण्यात येतील.***

उपरोक्त नमूद निकष पूर्ण करीत असलेल्या महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस उपअधीक्षक व त्याखालील दर्जाच्या पात्र पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह-२०१६ करिता प्रवर्गनिहाय शिफारशी मागविण्यात येत आहेत.

घटक प्रमुखांनी पात्र पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या शिफारशी पाठवितांना प्रवर्गनिहाय शिफारशी पाठवाव्यात. विवरणपत्रात नमूद केल्यानुसार रकाना ८ मध्ये एकच प्रवर्ग नमूद करावा. जर पोलीस अधिकारी / कर्मचारी हे एकापेक्षा जास्त प्रवर्गासाठी पात्र ठरत असेल तर इतर प्रवर्गाची माहिती रकाना ९ मध्ये नमूद करण्यात यावी. प्रवर्गनिहाय सन्मानचिन्हे मंजूर करतांना प्रामुख्याने रकाना ८ मध्ये नमूद प्रवर्गाच्या अनुषंगाने प्रकरणाची छाननी करण्यात येईल.

**शिफारशी करतांना घटक प्रमुखांचे खालील नमूद बाबींकडे लक्ष वेधण्यात येत आहे.**

१. प्रवर्ग १ बाबत घटकप्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील राष्ट्रपती पोलीस पदक / पोलीस पदक धारक पोलीस अधिकारी / कर्मचारी यांची माहिती स्वतंत्रपणे सादर करावी.

२. प्रवर्ग २ साठी घटना घडल्याचे स्पष्ट करणारी कागदपत्रे सोबत सादर करावीत. तसेच याच क्षेत्रात नेटाने केलेली प्रशंसनीय कामगिरी (पर्यवेक्षीय कर्तव्ये धरुन) केलेल्यांची सुध्दा शिफारस करण्यात यावी.

३. प्रवर्ग ३ बाबत विविध गुन्ह्यांचा योग्य तपास करुन आरोपी विरोधात कोर्टात खटले दाखल करेपर्यंत वाखाणण्याजोगे कसब दाखविणाऱ्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचीही शिफारस करण्यात यावी.

४. प्रवर्ग ४ साठी जीवनरक्षा पदकासाठी शिफारस करुनही मंजूर झाले नसेल अशांचीही शिफारस करण्यात यावी.

५. सर्वसामान्य जनतेच्या सुरक्षिततेसंबंधी असणाऱ्या अडचणी सोडविण्याकरिता सतत जागरुक राहून जनतेशी पोलीसांचे सौहार्दाचे संबंध प्रस्थापित करण्यास केलेले प्रयत्न सुध्दा विचारात घ्यावे.

६. फक्त **राष्ट्रीय स्तरावरील पदकप्राप्त** खेळाडूंचीच शिफारस करण्यात यावी. राज्य स्तरावरील खेळाडूंचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा व महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यातील शिफारशी प्रवर्ग ६ अंतर्गत करु नयेत.

७. पोलीसांच्या कामात सुधारणा घडविण्याकरिता सूचना आमलांत आणल्या असल्याची खातरजमा करुनच शिफारस करण्यात यावी.

८. सातत्याने रेकॉर्ड चांगले ठेवून गुणवत्तापूर्ण सेवा बजावलेली असावी. मागील दहा वर्षापैकी ३ गोपनीय शेरे उपलब्ध नसतील अशा शिफारशी करु नयेत.

९. चालक कर्मचाऱ्यांनी २० वर्षात अपघात केला नसल्याबाबत प्रमाणपत्र जोडावे.

१०. विशेष शाखेत कामगिरी केल्याचा कालावधी स्पष्टपणे नमूद करावा.

११. १ ते १० व्यतिरिक्त बजावलेली उल्लेखनीय / प्रशंसनीय / महत्त्वपूर्ण कामगिरी असावी.

उपरोक्त नमूद बाबींचा साकल्याने विचार करुन सर्व घटक प्रमुखांनी त्यांच्या अखत्यारीतील पात्र पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या नावाच्या शिफारशी त्यांच्या संबंधीत परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / अपर पोलीस महासंचालक यांच्या मार्फतीने तसेच सर्व पोलीस आयुक्तांनी त्यांच्या शिफारशी या कार्यालयास दिनांक ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत किंवा तत्पूर्वी पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात.

जिल्हा घटक कार्यालये तसेच इतर घटक कार्यालयांकडून प्राप्त होणाऱ्या शिफारशींची परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक व अपर पोलीस महासंचालक (गुन्हे अन्वेषण विभाग, बिनतारी संदेश विभाग, प्रशिक्षण व खास पथके, रारापोबल, वाहतूक, लोहमार्ग, दहशतवाद विरोधी पथक) स्तरावर छाननी होणे आवश्यक आहे. सेवापुस्तकातील नोंदीप्रमाणे शिक्षा/बक्षिसांची नोंद तसेच गोपनीय अहवाल नस्तीप्रमाणे गोपनीय अहवालाची प्रतवारी विवरणपत्रावर योग्यरितीने नोंद घेतली आहे किंवा कसे याची खात्री संबंधित अपर पोलीस महासंचालक / विशेष पोलीस महानिरीक्षक स्तरावर होणे आवश्यक आहे. बऱ्याच वेळा घटक कार्यालयांकडून प्राप्त होणाऱ्या शिफारशी जशा आहेत तशा छाननी न करता या कार्यालयास पाठविल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे. अपर पोलीस महासंचालक / विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी.

तरी घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी संबंधीतांच्या शिफारशी कृपया तात्काळ सोबत जोडलेल्या विवरणपत्रात नमूद करुन प्रवर्गनिहाय कामगिरी स्पष्ट करणाऱ्या अवतरणासह या कार्यालयास योग्य मार्फतीने ३१ डिसेंबर पूर्वी सादर करावयात. त्यानंतर आलेल्या शिफारशींचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही किंवा त्याबाबत पत्रव्यवहार केला जाणार नाही.